# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/१३

मसुदा गोपनीय
व्यवस्थापन परिषद

क्र.१५/२०२१-२२

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२२ मधील २९ मार्च, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पंधरावी सभा मंगळवार, **दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली.

**स्वागत :-** सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | मा. सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य | उपस्थित |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य | उपस्थित |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य | अनुपस्थित |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य | उपस्थित |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य | अनुपस्थित |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य | उपस्थित |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य | अनुपस्थित |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य | उपस्थित |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य | उपस्थित |
| १४. | डॉ. बी.एन. जगताप | सदस्य | अनुपस्थित |
| १५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| १६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १८. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | डॉ. विनोद पाटील (संचालक,प. व मु. मं.) | निमंत्रित | उपस्थित |
| २०. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |

- **अनुपस्थिती :-** प्राचार्य डॉ. महादाप्पा गोंडा, डॉ. बी.एन. जगताप, डॉ. सुभाष वाघमारे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

- **श्रध्दांजली :-**

**श्री. अजित शहा**

अलिबाग अर्बन बॅंकेचे माजी अध्यक्ष तथा कोकण एज्युकेशन सोसायटीचे माजी कार्यवाह श्री अजित शहा यांचे अल्पशा आजाराने दिनांक १० मार्च २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते.

**डॉ. सुभाष पवार**

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे सेवानिवृतत प्राध्यापक डॉ. सुभाष पवार यांचे अल्पशा आजाराने दिंनांक ११ मार्च २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**श्रीमती. इदिरांबाई कडू**

राज्याचे जलसंपदा, शालेय शिक्षण, कामगार, महिला व बालकल्याण व विमुक्त भटक्या जमाती कल्याण विभागांचे राज्यमंत्री तथा अकोला जिल्हाचे पालकमंत्री श्री. बच्चू कडू यांच्या मातोश्री इदिरांबाई कडू यांचे दिर्घ आजाराने दिनांक १२ मार्च २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या.

**श्रीमती. वत्सला देशमुख**

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती वत्सला देशमुख यांचे वृध्दापकाळाने दिनांक १२ मार्च २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९२ वर्षांच्या होत्या.

**प्रा. सुरेश नाखरे**

अभियांत्रिकी, तंत्रशिक्षणाबाबत विद्यार्थी वर्गात जागरूक दृष्टिकोन निर्माण करणारे माटुंगा येथील वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेतील (व्हीजेटीआय) विद्यार्थीप्रिय प्राध्यापक सुरेश नाखरे यांचे दीर्घ आजाराने दिनांक १८ मार्च २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते.

**श्री. सुधीर बेडेकर**

संपादक आणि प्रसिध्द मार्क्सवादी विचारवंत-लेखक श्री सुधीर बेडेकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २५ मार्च २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दि. ११ मार्च, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | दि. ११ मार्च, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये जलदगती पद्धतीने मंजूरी मिळालेल्या अतिरिक्त तुकडया शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नियमित करण्यासाठी प्राप्त प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी जलदगती अतिरिक्त तुकडयांचे प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नियमित करण्यासाठी शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४ दि. ४ जुलै, २०१७ नुसार व तज्ज्ञ समितीचा अहवाल, अधिष्ठाता मंडळाचे निर्णय व कुलगुरूंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन व्यवस्थापन परिषदेने ७ महाविद्यालयांपैकी ७ पात्र प्रस्ताव शिफारसीसह (परिशिष्ट-'ब') शासनाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नविन अभ्यासक्रम/विद्याशाखा/ विषय/अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता प्राप्त प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली व असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नविन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४ दि. १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित परिशिष्ट 'अ' 'ब' नुसार कार्यवाही करून छाननी समिती, तज्ज्ञ समितीच्या शिफारसी, अधिष्ठाता मंडळाचा निर्णय व कुलगुरूंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन एकुण १५१ प्राप्त प्रस्तावांपैकी १४४ प्रस्ताव पात्र व ०७ प्रस्ताव अपात्र झाले. शासन निर्णयानुसार (परिशिष्ट-'अ') शासनाकडे सादर करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.४<br><br>बाब क्र. १३ | Minutes of Building and Works Committee dated 3rd March, 2022 and 28th March, 2022 to place before Management Council for its approval.<br>Minutes of Building and Works Committee dated 28th March, 2022 to place before Management Council for its approval. | पा. सु. नि. अं. व दे. वि. |
| ठराव | Minutes of Building and Works Committee dated 3rd March, 2022 and 28th March, 2022 are accepted.<br>As for item no.4 of the meeting of 28th March, 2022, after considerable discussion the members of Management Council have unanimously resolved to accept the commercial terms offered by winning bidder M/s Padeco Company Limited and has granted permission to issue work order by incorporating additional points as per expert recommendation and execute agreement with M/s Padeco Company Limited for the said work. | |
| बाब क्र.५ | आय.पी.एल. सामन्यासाठी विद्यापीठ क्रीडा संकुल मरीनलाईन्स येथील मैदान व बास्केटबॉल कोर्ट शुल्क निश्चित करणेबाबत. | विद्यापीठ क्रीडा संकुल |
| ठराव | मुंबई क्रिकेट संघटना यांनी आय.पी.एल. २०२२ च्या सामन्यांसाठी विद्यापीठ क्रीडा संकुल मरीनलाईन्स येथील मैदान व बास्केटबॉल कोर्ट वापरण्यासाठी आकारलेल्या शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत दिलेल्या विनंतीवजा पत्राच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली व अंतिमत: सर्वानुमते असे ठरले की, या वर्षीच्या आयपीएल २०२२ साठी मुंबई क्रिकेट संघटनेकडून एकूण रू.४५ लाख (अधिक त्यावरची GST आकार) आकारण्यात यावेत. तसेच त्याचबरोबर यापूर्वीच्या थकीत रक्कमेचाही भरणा त्यांनी करावा.<br>चर्चेच्या अुनषंगाने असेही ठरले की, मुंबई क्रिकेट संघटनेने मुंबई विद्यापीठाच्या ज्या ज्या तत्कालीन पदाधिका-यांना सदस्यत्व दिले होते त्यांना विद्यापीठाने सदर सदस्यत्व मुंबई क्रिकेट संस्थेस (मेंबरशीप कार्डसह) सदस्यत्व ओळखपत्रासह परत करणेबाबतचे पत्र लिहावे व त्याची प्रत मुंबई विद्यापीठास पाठविणेबाबतचे पत्र लिहावे. | |
| बाब क्र.६ | To resolve that the University of Mumbai Alumni Association (UMAA) is the association of former students of University of Mumbai and is the only recognized Body of University of Mumbai. | विद्यार्थी विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, "University of Mumbai Alumni Association" (UMAA) हीच विद्यापीठाची एकमेव अधिकृत संघटना राहील. UMAA च्या माध्यमातून जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करणे व माजी विद्यार्थ्यांकडून अनुदान गोळा करण्याची सर्वस्वी जबाबदारी UMAA ची राहील. तसेच इतर सेवा सुविधा पुरविणे, निधी उभारणे, इत्यादीसाठी UMAA ने निवडलेल्या टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्मचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच UMAA च्या कार्यकारणी समितीमध्ये विद्यापीठाचे (कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक - विद्यार्थी विकास विभाग व्यतिरिक्त) कुलगुरू निर्देशित ५ सदस्य असावेत असेही सर्वानुमते ठरले. | |
| बाब क्र.७ | लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ येथील ९ शिक्षकेतर तांत्रिक पदांच्या शैक्षणिक अर्हता, मानधन व वयोमर्यादा अद्ययावत करणेबाबत. | लोककला अकादमी |
| ठराव | लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ येथील ९ शिक्षकेतर तांत्रिक पदांच्या शैक्षणिक अर्हता, मानधन व वयोमर्यादा अद्ययावत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.८ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्या (Board of National & International Linkages) दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने विविध शैक्षणिक संस्थांचे मुंबई विद्यापीठाशी असलेल्या प्रस्तावित सामंजस्य करारांना (MoU) मान्यता देण्याबाबत. | नवोपक्रम, नव संशोधन व साहचर्य |
| ठराव | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्या (Board of National & International Linkages) दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने विविध शैक्षणिक संस्थांचे मुंबई विद्यापीठाशी असलेल्या प्रस्तावित सामंजस्य करारांना (MoU) मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.९ | मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राचे "धर्मवीर आनंद दिघे" असे नामकरण करण्याबाबतचा मा. एकनाथ शिंदे, मंत्री नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) महाराष्ट्र राज्य यांचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपपरिसराचे "मुंबई विद्यापीठाचे धर्मवीर आनंद दिघे ठाणे उपपरिसर" असे नामकरण करण्याबाबतचा मा. एकनाथ शिंदे, मंत्री नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) महाराष्ट्र राज्य यांचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. | |
| बाब क्र. १० | दिनांक १ मार्च, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बाब क्र.३ च्या ठरावानुसार मुंबई विद्यापीठाचे हेलिपॅड बाहेरील व्यक्तींना वापरण्यास देण्यासंबधी मार्गदर्शन तत्वे तयार करण्यासाठी, निश्चित भाडे आकारण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | प्रशासकीय विभाग, विद्यानगरी |
| ठराव | दिनांक १ मार्च, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बाब क्र.३ च्या ठरावानुसार मुंबई विद्यापीठाचे हेलिपॅड बाहेरील व्यक्तींना वापरण्यास देण्यासंबधी मार्गदर्शन तत्वे तयार करण्यासाठी, निश्चित भाडे आकारण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सन २०२१-२२ साठी विद्यापीठाचे हेलिपॅड एकावेळेस वापरण्यासाठीचे शुल्क रू.१०,०००/- वाहनतळ शुल्क रू.५,०००/-(प्रति तास) आकारण्यात आणि अनामत रक्कम रू.२५,०००/- आगावू घेण्यात यावे. तसेच ठराविक कालांतराने विद्यापीठाने सदर दर सुधारित करावे असे समितीने प्रस्तावित केले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | आयत्यावेळी आलेल्या बाबी | |
| बाब क्र. ११ | शैक्षणिक वर्ष २०२०-२२ करिताचे विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखा अंतर्गत येणाऱ्या B.Pharma Second Year (DSP) Direct Second Year Pharmacy- Sem III Term I & M.Pharm First Year अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था कोरोना (Covid-19) महामारीमुळे फार्मसी प्रवेश उशीर झाल्यामुळे Arrangement of Term विचारार्थ सादर. | वि. स. व से. |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२०-२२ करिताचे विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखा अंतर्गत येणाऱ्या B.Pharma Second Year (DSP) Direct Second Year Pharmacy- Sem III Term I & M.Pharm First Year अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था कोरोना (Covid-19) महामारीमुळे फार्मसी प्रवेश उशीर झाल्यामुळे Arrangement of Term च्या प्रस्तावास मान्यता | |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात आली. | |
| बाब क्र. १२ | शैक्षणिक वर्ष २०२०-२२ करिताचे विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखा (अभियांत्रिकी) अंतर्गत येणाऱ्या MCA First Year (Full time), FE, DSE & ME First Year (Full time) अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था कोरोना (Covid-19) महामारीमुळे अभियांत्रिकी प्रवेश उशीर झाल्यामुळे Arrangement of Term विचारार्थ सादर. | वि. स. व से. |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२०-२२ करिताचे विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखा (अभियांत्रिकी) अंतर्गत येणाऱ्या MCA First Year (Fulltime), FE, DSE & ME First Year (Fulltime) अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था कोरोना (Covid-19) महामारीमुळे अभियांत्रिकी प्रवेश उशीर झाल्यामुळे Arrangement of Term च्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १३ | Minutes of Building and Works Committee dated 28th March, 2022 to place before Management Council for its approval. | |
| ठराव | सदर बाबतचा ठराव याच सभेतील बाब क्र.४ सोबत एकत्रित करण्यात आला. | |
| बाब क्र. १४ | तौक्ते चक्रिवादळामुळे झालेल्या नुकसानाबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ सादर. | राष्ट्रीय सेवा योजना |
| ठराव | तौक्ते चक्रिवादळामुळे झालेल्या नुकसानाबाबत गठीत केलेल्या समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. तसेच असेही ठरले की, महाविद्यालयांना जास्तीत जास्त एक लाख अथवा एक लाखापेक्षा कमीचे नुकसान झाले असल्यास ती रक्कम असेल यापैकी जे कमी असेल ते देण्यात यावे. | |
| बाब क्र. १५ | Report of the Local Inquiry Committee of Suman Education Society, L.N. College of Commerce & Science (Women), Shri. Krishna Prasarak Mandal, 79, Shri. Krishna Nagar, Borivali (E)-400 066, for Conversion of Women's Institution to Co-Education. | College Affiliation & Development Departmen |
| ठराव | सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली व सुमन एज्युकेशन सोसायटी, एल. एन. महाविद्यालय, वाणिज्य आणि विज्ञान (महिला), श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ, ७९, श्रीकृष्ण नगर, बोरीवली (पुर्व) ४०००६६ हया महाविद्यालयाचे महिला महाविद्यालया ऐवजी सह-शिक्षण (co-education) महाविद्यालय असे रूपांतर करण्यासाठी | |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळीचे निर्णय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्वे यांच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू